Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शुक्रवार, दि. 19 जून २०२६ । वर्ष १ । अंक ७४ । पाने २ । TITLE CODE-T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

**मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद**

(पान २ वर)



## Selected

### उद्धव ठाकरेंची साथ सोडणे ओमराजे निंबाळकरांना महागात?

मुंबई । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी शिंदे गटात जाण्याच्या चर्चांना उधाण आले असतानाच त्यांना सोशल मीडियावर मोठा फटका बसल्याची चर्चा रंगली आहे. उद्धव ठाकरे यांची साथ सोडण्याचा निर्णय अनेक समर्थकांना न रुचल्याने अवघ्या काही तासांत त्यांच्या सोशल मीडिया खात्यावरील सुमारे १५ हजार फॉलोअर्सनी अनफॉलो केल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, ठाकरे गटातील सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करण्यासाठी लोकसभा अध्यक्षांकडे पत्र दिल्याची चर्चा असून, ओमराजे निंबाळकर हेही त्यामध्ये सहभागी असल्याचे सांगितले जात आहे. ठाकरे गटाने बोलावलेल्या बैठकीलाही ते अनुपस्थित राहिल्याने त्यांच्या भूमिकेबाबतच्या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे.

## गिरीश महाजनांचा घणाघात, 'आता नगरसेवकही ठाकरेंना सोडतील'

# 'संजय राऊत हे मानवी बॉम्ब'!

## ठाकरे गटावर जलसंपदा मंत्र्यांची जोरदार टीका; 'राडा करायला आता कोणीच शिल्लक नाही

**जन सम्राट टाईम्स**

**नाशिक : शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांच्यावर जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी जोरदार टीका करत त्यांना "मानवी बॉम्ब" अशी उपमा दिली. संजय राऊत यांच्या वक्तव्यांमुळे आणि राजकीय भूमिकेमुळे ठाकरे गटाचे सर्वाधिक नुकसान झाले असून, उद्धव ठाकरे यांनी हा "मानवी बॉम्ब" स्वतःच्या गळ्यात बांधून घेतल्याची टीका त्यांनी केली.**



नाशिकमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महाजन म्हणाले की, संजय राऊत यांना आवरण्याचा सल्ला अनेकदा देण्यात आला होता. मात्र तो गांभीर्याने घेतला गेला नाही. परिणामी पक्षातील अनेक नेते आणि कार्यकर्ते दूर गेले असून, आता परिस्थिती अशी आहे की मुंबई महापालिकेतील नगरसेवकदेखील पक्षाला 'जय महाराष्ट्र' करण्याच्या तयारीत आहेत.

'राडा करायला कोणीच उरले नाही' ठाकरे गटातील खासदारांच्या कथित फुटीनंतर संजय राऊत यांनी 'राडा' करण्याचे आवाहन केल्याच्या पार्श्वभूमीवर महाजन म्हणाले की, "राडा करायला आता त्यांच्या पक्षात कोणीच शिल्लक राहिलेले नाही. ते दिवस संपले, जेव्हा तुम्ही आमच्यासोबत होता. आता काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसून राहुल गांधी यांना पंतप्रधान बनवण्यासाठी मागे-पुढे फिरत आहात."

त्यांनी ठाकरे गटाच्या संघटनात्मक स्थितीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत, पक्षातील आमदार आणि नेते स्वतः राऊतांच्या वक्तव्यांमुळे नाराज असल्याचा दावा केला. 'पक्ष चालवण्याची ही कुठली पद्धत?' गिरीश महाजन यांनी ठाकरे गटाच्या कार्यपद्धतीवरही निशाणा साधला. "ज्यांना राहायचे त्यांनी राहा, ज्यांना जायचे त्यांनी जा, अशी भूमिका घेऊन पक्ष चालत नाही. लोक तुमची बडबड ऐकण्यासाठी थांबणार नाहीत," असे ते म्हणाले. भाजपवर पैसे, ईडी आणि ईव्हीएमचा वापर करून निवडणुका जिंकत असल्याचे विरोधकांकडून सातत्याने आरोप केले जातात. मात्र विरोधक वास्तव स्वीकारण्यास तयार नसल्याचे सांगत महाजन यांनी हे आरोप फेटाळून लावले. 'शिंदेंची ताकद वाढली म्हणजे महायुतीची ताकद वाढली' उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची ताकद वाढत असल्याबाबत बोलताना महाजन म्हणाले की, खासदारांची संख्या वाढल्याने शिंदेंची ताकद वाढली असली तरी त्याचा थेट फायदा संपूर्ण महायुतीलाच होणार आहे. त्यामुळे त्यात कोणालाही वाईट वाटण्याचे कारण नाही.

### 'कार्यकर्त्यांना भेटणे ही आमची संस्कृती'

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांशी संपर्क वाढवण्याबाबत बोलताना महाजन म्हणाले की, प्रत्येक निवडणूक गांभीर्याने घेतली जाते. "कार्यकर्ते आमच्यासाठी मेहनत घेतात. त्यामुळे त्यांना भेटण्यासाठी आम्ही गेलो, तर त्यात गैर काहीच नाही. आमच्याकडे कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडण्याची पद्धत नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरसेवकांवर कुठलाही त्रागा व्यक्त केलेला नसून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केवळ आवश्यक त्या सूचना दिल्या असल्याचेही महाजन यांनी सांगितले. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर गिरीश महाजन यांच्या या वक्तव्यांमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले असून, ठाकरे गटाकडून यावर काय प्रतिक्रिया येते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## बेस्ट कर्मचाऱ्यांचा मध्यरात्रीपासून बेमुदत संप

### मुंबईकरांच्या प्रवासासह वीजपुरवठ्यावरही परिणामाची शक्यता

**जन सम्राट टाईम्स**



**मुंबई | प्रतिनिधी**

मुंबईची दुसरी जीवनवाहिनी मानली जाणारी बेस्ट बस सेवा आज मध्यरात्रीनंतर ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बेस्ट उपक्रमातील १२ कामगार संघटनांनी एकत्र येत विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संपाची घोषणा केली असून, या आंदोलनामुळे मुंबई आणि उपनगरातील लाखो प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. 'बेस्ट संयुक्त कामगार कृती समिती'च्या माध्यमातून हा संप पुकारण्यात आला असून, केवळ बससेवेपुरता मर्यादित न राहता वाहतूक विभागासह विद्युत पुरवठा आणि इतर विभागातील कर्मचारीही या आंदोलनात सहभागी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक आणि वीजपुरवठा या दोन्ही अत्यावश्यक सेवांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

प्रलंबित मागण्यांवर निर्णय न झाल्याने आक्रमक भूमिका बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीने आजी-माजी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. १८ जूनच्या मध्यरात्रीपर्यंत प्रशासनाने सकारात्मक भूमिका न घेतल्यास बेमुदत संपावर जाण्याचा निर्वाणीचा इशारा समितीने दिला होता. त्यानुसार आता आंदोलनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. कामगार संघटनांचे म्हणणे आहे की, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत असून, त्यामुळे संपाशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही.

### मुंबईच्या जनजीवनावर परिणाम होण्याची शक्यता

बेस्ट उपक्रमामार्फत दररोज लाखो प्रवाशांना बससेवा उपलब्ध करून दिली जाते. त्याचबरोबर मुंबई शहरातील अनेक भागांमध्ये वीजपुरवठ्याची जबाबदारीही बेस्ट प्रशासनाकडे आहे. त्यामुळे वाहतूक आणि विद्युत विभागातील कर्मचारी संपात सहभागी झाल्यास मुंबईतील दैनंदिन जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः कार्यालयीन वेळा, शाळा-महाविद्यालये आणि व्यावसायिक व्यवहारांवर या संपाचा मोठा परिणाम होऊ शकतो.

---

## जळगावात पोलिसांचे पहाटे कोंबिंग ऑपरेशन; अवघ्या 3 तासांत १२५ गुन्हेगारांना बेड्या

### वाढत्या गुन्हेगारीवर पोलिसांचा आक्रमक पवित्रा; शहरातील सहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाचवेळी धडक कारवाई

**जन सम्राट टाईम्स**



**जळगाव | प्रतिनिधी**

जळगाव शहरात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने सराईत गुन्हेगारांविरोधात मोठी मोहीम हाती घेत पहाटे व्यापक 'कोंबिंग ऑपरेशन' राबवले. या विशेष कारवाईत अवघ्या तीन तासांत १२५ अट्टल व सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेण्यात आले असून, शहरातील गुन्हेगारी विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.

आज पहाटे ३ ते सकाळी ६ वाजेदरम्यान राबविण्यात आलेल्या या धडक मोहिमेचा उद्देश शहरातील कायदा व सुव्यवस्था मजबूत करणे आणि गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण करणे हा होता.

सहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाचवेळी छापेमारी या कारवाईअंतर्गत शहर पोलीस ठाणे, शनिपेठ, एमआयडीसी, रामानंद नगर, जळगाव तालुका आणि जिल्हापेठ पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील संवेदनशील भागांमध्ये पोलिसांनी एकाचवेळी छापेमारी केली. पहाटेच्या अंधारात अचानक झालेल्या या कारवाईमुळे अनेक गुन्हेगारांची धांदल उडाली.

वॉन्टेड आरोपी आणि तडीपार गुंडांवर विशेष लक्ष कोंबिंग ऑपरेशनदरम्यान पोलिसांनी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार, गंभीर गुन्ह्यांतील फरार आरोपी तसेच शहरातून तडीपार करण्यात आले असूनही बेकायदेशीररीत्या वावरणाऱ्या गुंडांचा शोध घेत त्यांच्यावर कारवाई केली.

या धडक मोहिमेत एकूण १२५ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

---

## ऐन पावसाळ्यात जळगावकरांना उष्णतेचे चटके!

### आयएमडीचा 'यलो अलर्ट', मान्सूनची प्रतीक्षा कायम

**जन सम्राट टाईम्स**



**जळगाव । प्रतिनिधी :** जून महिन्याचा अर्धा टप्पा पार पडूनही जळगाव जिल्ह्यात मान्सूनचे आगमन झालेले नसल्याने शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली आहे. पावसाने दडी मारल्याने एकीकडे खरीप हंगामाचे नियोजन रखडले आहे, तर दुसरीकडे वाढत्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने (IMD) जिल्ह्यासाठी उष्णतेच्या लाटेचा 'यलो अलर्ट' जारी केल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार १८ आणि १९ जून रोजी जिल्ह्यात उष्णतेची तीव्रता कायम राहणार असून, नागरिकांना प्रचंड उकाडा आणि दमट वातावरणाचा सामना करावा लागणार आहे. ऐन पावसाळ्याच्या काळात उष्णतेसाठी 'यलो अलर्ट' जारी होण्याची घटना दुर्मीळ मानली जात असून, यामुळे सर्वसामान्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. राजस्थानकडील उष्ण वाऱ्यांचा परिणाम सामान्यतः जून महिन्यात अरबी समुद्राकडून बाष्पयुक्त वारे वाहू लागल्याने पावसासाठी पोषक वातावरण तयार होते. मात्र, यंदा राजस्थानच्या दिशेने येणाऱ्या उष्ण वाऱ्यांचा प्रभाव महाराष्ट्रावर जाणवत असल्याने उष्णतेची लाट निर्माण झाली आहे. तापमान ४१ ते ४२ अंश सेल्सिअसच्या आसपास असले तरी वातावरणातील आर्द्रतेमुळे नागरिकांना प्रत्यक्ष जाणवणारे तापमान ४५ ते ४६ अंशांपर्यंत पोहोचत असल्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. पावसाची अत्यल्प नोंद, शेतकरी चिंतेत १ ते १७ जून या कालावधीत जळगाव जिल्ह्यात केवळ ९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यापैकी ३ जून रोजी एकट्या ५ मिलिमीटर पाऊस झाला होता, तर उर्वरित दिवसांत केवळ ४ मिलिमीटर पाऊस पडला आहे.

### पुढील काही दिवसांचा संभाव्य हवामान अंदाज

| दिनांक | कमाल तापमान | वातावरणाची स्थिती |
|---|---|---|
| २० जून | ४०°से. | अंशतः ढगाळ वातावरण |
| २१ जून | ४०°से. | अंशतः ढगाळ वातावरण |
| २२ जून | ४०°से. | काही प्रमाणात ढगाळ वातावरण |

सध्या तरी पुढील तीन ते चार दिवस जिल्ह्यात दमदार पावसाची कोणतीही ठोस शक्यता नसल्याचे हवामान विभागाच्या अंदाजातून स्पष्ट होत असून, नागरिकांनी उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

## जळगाव विधान परिषद निवडणुकीत ९७.७८ टक्के विक्रमी मतदान

### चाळीसगावमध्ये बहिष्काराचा परिणाम



**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी**

जळगाव स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवारी शांततापूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यातील एकूण ६३० मतदारांपैकी तब्बल ६१६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत ९७.७८ टक्के विक्रमी मतदान नोंदविले. मात्र, चाळीसगावमध्ये नगरसेवकांनी दिलेल्या बहिष्काराच्या हाकेमुळे तेथील मतदानाची टक्केवारी जिल्ह्यात सर्वात कमी राहिली.

सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेदरम्यान पार पडलेल्या मतदानात ६३० पैकी ६१६ मतदारांनी मतदान केले, तर १४ मतदार विविध कारणांमुळे मतदान प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत.

पुरुष मतदारांपैकी ३१५ पैकी ३०९ जणांनी मतदान करून ९८.१० टक्के, तर महिला मतदारांपैकी ३१५ पैकी ३०७ जणींनी मतदान करून ९७.४६ टक्के मतदानाची नोंद झाली.

पाच मतदान केंद्रांवर शंभर टक्के मतदान जिल्ह्यातील अमळनेर, फैजपूर, जळगाव, एरंडोल आणि पाचोरा या मतदान केंद्रांवर शंभर टक्के मतदान झाले. तर भुसावळ केंद्रात ११८ पैकी ११६ मतदारांनी मतदान केल्याने तेथे ९८.३१ टक्के मतदान नोंदविण्यात आले.

चाळीसगावमध्ये बहिष्काराचा थेट फटका

**अमळनेर, फैजपूर, जळगाव, एरंडोल आणि पाचोरा येथे १०० टक्के मतदान; निकालाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष**

चाळीसगाव मतदान केंद्रात मात्र केवळ ७०.७३ टक्के मतदान झाले. येथील ४१ मतदारांपैकी फक्त २९ जणांनी मतदान केले, तर १२ मतदारांनी मतदानापासून दूर राहणे पसंत केले.

भाजपच्या उमेदवारीविरोधात नाराजी व्यक्त करत शहर विकास आघाडीच्या ११ नगरसेवकांसह दोन अपक्ष नगरसेवकांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाचा थेट परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले.

### निकालाकडे सर्वांचे लक्ष

चाळीसगाव वगळता जिल्ह्यातील बहुतांश मतदान केंद्रांवर जवळपास शंभर टक्के मतदान झाल्याने निवडणुकीत चुरस निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असून आता मतपेटीत बंद झालेल्या मतांमधून विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे जिल्ह्यासह राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## खान्देश एक्सप्रेसवेने बदलणार उत्तर महाराष्ट्राचा चेहरामोहरा!

### जळगाव ते संभाजीनगर अवघ्या एका तासावर! समृद्धी महामार्गाशी थेट जोडणीमुळे मुंबई केवळ पाच तासांच्या अंतरावर

**जन सम्राट टाईम्स**



**जळगाव, जामनेर/ | प्रतिनिधी :** उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणारा महत्त्वाकांक्षी 'खान्देश एक्सप्रेसवे' प्रकल्प आता प्रत्यक्षात येण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. जळगाव ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान प्रस्तावित असलेल्या या सहा पदरी द्रुतगती महामार्गाचे प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण झाले असून अंतिम आराखड्याची प्रक्रिया सुरू आहे. हा महामार्ग पूर्ण झाल्यानंतर जळगाव ते छत्रपती संभाजीनगर हे अंतर अवघ्या एका तासात, तर मुंबईचा प्रवास केवळ पाच तासांत पूर्ण करणे शक्य होणार आहे.

१०५ किलोमीटरचा आधुनिक द्रुतगती मार्ग सुमारे १०५ किलोमीटर लांबीचा हा एक्सप्रेसवे जळगाव शहरातून सुरू होऊन धरणगाव, जामनेर किंवा पहूर, फर्दापूर मार्गे छत्रपती संभाजीनगरपर्यंत जाणार आहे. पुढे हा मार्ग थेट नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाला जोडला जाणार असल्याने उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांसाठी जलद आणि सुरक्षित प्रवासाचा नवा पर्याय उपलब्ध होणार आहे.

### गावांना वळसा, प्रवास अधिक वेगवान

महामार्गाचा आराखडा तयार करताना बहुतांश खेडेगावांना वळसा घालून मार्गाची आखणी केली जात आहे. त्यामुळे छोट्या गावांमधील वाहतूक कोंडी टाळून वाहनांना थेट आणि अखंड प्रवास करता येणार आहे. विशेषतः अजिंठा लेणी, जंगल डोंगराळ परिसराचे पर्यावरणीय संरक्षण लक्षात घेऊनच मार्गाची अंतिम आखणी करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

### शेतकरी आणि उद्योग क्षेत्राला मोठा दिलासा

या द्रुतगती महामार्गाचा सर्वाधिक फायदा जळगाव जिल्ह्यातील कृषी क्षेत्राला होणार आहे. जळगावमधून दररोज मोठ्या प्रमाणात केळी, कापूस, भाजीपाला आणि इतर कृषी उत्पादने मुंबईसह विविध बाजारपेठांकडे पाठवली जातात. सध्या वळणदार रस्ते आणि वाहतूक कोंडीमुळे वेळ आणि खर्च वाढतो. मात्र एक्सप्रेसवे सुरू झाल्यानंतर हा माल कमी वेळेत मोठ्या बाजारपेठांमध्ये पोहोचू शकेल. याशिवाय खान्देशातील कच्चा माल छत्रपती संभाजीनगरमधील ऑटोमोबाईल आणि अभियांत्रिकी उद्योगांपर्यंत जलदगतीने पोहोचविणे शक्य होणार असल्याने औद्योगिक क्षेत्रालाही मोठा फायदा होणार आहे.

### पर्यटनालाही मिळणार चालना

समृद्धी महामार्गाशी जोडणी झाल्यामुळे राज्याच्या विविध भागांतून येणाऱ्या पर्यटकांना अजिंठा आणि वेरूळ लेणीसारख्या जागतिक वारसा स्थळांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होईल. त्यामुळे पर्यटन उद्योगालाही नवी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### प्रवासातील ३ ते ४ तासांची बचत

सध्या जळगावहून मुंबईला जाण्यासाठी मालेगाव आणि नाशिकमार्गे साधारण ७ ते ८ तासांचा कालावधी लागतो. मात्र खान्देश एक्सप्रेसवे आणि समृद्धी महामार्गाच्या जोडणीमुळे हा प्रवास केवळ पाच तासांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वेळ, इंधन आणि वाहतूक खर्चात मोठी बचत होणार असून उत्तर महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला नवे बळ मिळणार आहे.

# आईच्या निधनाच्या दु:खात असताना चोरट्यांचा हैदोस!

## देवपूरातील मयूर कॉलनीतील धक्कादायक घटना; ९ तोळे सोने, अडीच किलो चांदी, लाखोंची रोकड व विदेशी चलन लंपास

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी**
धुळे शहरातील देवपूर परिसरात एक धक्कादायक चोरीची घटना समोर आली असून, आईच्या निधनामुळे अंत्यविधीसाठी घराबाहेर गेलेल्या भदाणे कुटुंबाच्या घरात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केली. या घटनेत सुमारे ९ तोळे सोने, अडीच किलो चांदी, लाखो रुपयांची रोकड तसेच विदेशी चलन असा मौल्यवान ऐवज लंपास करण्यात आला असून, चोरटे घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, देवपूरातील मयूर कॉलनीतील प्लॉट क्रमांक ९ येथे राहणारे खाजगी कंत्राटदार पृथ्वीराज भदाणे यांच्या आईचे निधन झाल्याने संपूर्ण कुटुंब अंत्यविधीसाठी शेजारील प्रोफेसर कॉलनीत गेले होते. घर बंद असल्याची संधी साधत मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला.

चोरट्यांनी घरातील कपाट फोडून सुमारे ९ तोळे सोन्याचे दागिने, अडीच किलो चांदीच्या वस्तू, लाखो रुपयांची रोकड तसेच विदेशी चलन चोरून नेले. सकाळी अंत्यविधी आटोपून कुटुंबीय घरी परतले असता घराचा दरवाजा तुटलेला आणि घरातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत दिसून आले. त्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने देवपूर पोलिसांना माहिती दिली.



घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकारी, श्वानपथक आणि न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) पथक घटनास्थळी दाखल झाले. घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये संशयित चोरट्यांचे चित्रण कैद झाल्याने पोलिसांनी त्याच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून आरोपींचा शोध सुरू आहे.

आईच्या निधनामुळे आधीच दुःखात असलेल्या भदाणे कुटुंबावर या चोरीमुळे दुहेरी संकट कोसळले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शहरातील वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास देवपूर पोलीस करीत असून, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. धार्मिक किंवा कौटुंबिक कारणांमुळे घर बंद असल्याची संधी साधून चोरी करणाऱ्या टोळ्यांवर आळा घालण्याचे मोठे आव्हान सध्या पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# प्रलंबित मागण्यांसाठी पशुवैद्यकीय पदविकाधारकांचा एल्गार

## २२ जून रोजी पुण्यात धरणे आंदोलन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी**
राज्यातील पशुवैद्यकीय पदविकाधारकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या न्याय्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, २२ जून २०२६ रोजी पुण्यात एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. 'पशुवैद्यकीय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवस्थापन सेवा संघ, महाराष्ट्र राज्य' यांच्या वतीने हे आंदोलन औंध येथील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास आयुक्तालयासमोर सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार आहे.

राज्यातील दुर्गम व ग्रामीण भागात पशुधन विकास, कृत्रिम रेतन, दुग्ध व्यवसाय वृद्धी आणि पशुरोग नियंत्रणासाठी पदविकाधारक पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान असूनही त्यांच्या विविध मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

### प्रमुख मागण्या

'महाराष्ट्र राज्य दुय्यम पशुवैद्यकीय परिषद विधेयक' तातडीने शासकीय विधेयक म्हणून मंजूर करावे. बोव्हाईन ब्रीडिंग ॲक्टमध्ये आवश्यक सुधारणा करून संबंधित पदविका अभ्यासक्रमांचा समावेश करावा. कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना आवश्यक साहित्य, योग्य मानधन आणि विमा संरक्षण उपलब्ध करून द्यावे तसेच दंडात्मक तरतुदींमध्ये आवश्यक बदल करावेत. पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचनेत निर्माण झालेली पशुधन पर्यवेक्षकांची रिक्त पदे सरळसेवेने तातडीने भरावीत. पशुसंवर्धन, दुग्धव्यवस्थापन व पशुवैद्यकीय पदविका अभ्यासक्रमांना शासनमान्यता देऊन पदविकाधारकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक हक्कांचे संरक्षण करावे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# वाकी नदी स्वच्छता मोहिमेला यश!

## प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद, चौधरींचे बेमुदत उपोषण स्थगित



जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी :** नशिराबाद येथील वाकी नदीच्या दुरवस्थेबाबत सातत्याने पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याने सामाजिक कार्यकर्ते रोहित बाळू चौधरी यांनी १९ जून २०२६ पासून नशिराबाद नगर परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला होता. मात्र, प्रशासनाने या इशाऱ्याची गांभीर्याने दखल घेत नदी स्वच्छतेचे काम युद्धपातळीवर सुरू केल्याने त्यांनी आपले प्रस्तावित बेमुदत उपोषण तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

रोहित चौधरी यांनी १० जून रोजी प्रशासनाला उपोषणाबाबत अंतिम निवेदन दिल्यानंतर नशिराबाद नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी १८ जून २०२६ रोजी लेखी पत्राद्वारे वाकी नदी स्वच्छता मोहीम सुरू असल्याची माहिती दिली. नदीपात्रातील कचरा, गाळ आणि इतर अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्रीच्या सहाय्याने टप्प्याटप्प्याने काम सुरू असल्याने उपोषण मागे घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, अशी विनंतीही या पत्रातून करण्यात आली.

प्रशासनाच्या या भूमिकेची दखल घेत रोहित चौधरी यांनी प्रत्यक्ष वाकी नदी परिसराची पाहणी केली. यावेळी नदीपात्रातील सुमारे ७० टक्के स्वच्छता व साफसफाईचे काम पूर्ण झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी मुख्याधिकारी तसेच नशिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना लेखी पत्र देऊन प्रस्तावित बेमुदत उपोषण तूर्तास मागे घेत असल्याची माहिती दिली.

याबाबत प्रतिक्रिया देताना रोहित बाळू चौधरी म्हणाले, "प्रशासनाने आमच्या निवेदनाची सकारात्मक दखल घेत वाकी नदी स्वच्छतेच्या कामाला गती दिली आहे, ही समाधानाची बाब आहे. त्यामुळे आम्ही उपोषण सध्या स्थगित करत आहोत.

### नदी स्वच्छतेचे कामकाज पूर्ण होईपर्यंत लक्ष राहणार

नदीच्या स्वच्छतेचे शंभर टक्के काम पूर्ण होईपर्यंत या संपूर्ण प्रक्रियेवर आमचे बारकाईने लक्ष राहील." दरम्यान, नगर परिषदेच्या टपाल संकलन केंद्राने उपोषण स्थगितीचे पत्र स्वीकारले असून त्याची प्रत नशिराबाद पोलीस प्रशासनालाही पाठविण्यात आली आहे. या सकारात्मक घडामोडींमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# उत्साहात साजरी हिंदुसूर्य वीरशिरोमणी महाराणा प्रताप यांची ४८६ वी जयंती

## रक्तदान शिबिराचेही आयोजन

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर । प्रतिनिधी**
हिंदुसूर्य वीरशिरोमणी महाराणा प्रताप यांची ४८६ वी जयंती अमळनेर येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून महाराणा प्रताप यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेच्या विचारांना अभिवादन केले.

या कार्यक्रमाला अमळनेर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा माजी मदत व आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल भाईदास पाटील प्रमुख उपस्थित होते. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, पक्षाचे पदाधिकारी जितेंद्र ठाकूर, माजी उपनगराध्यक्ष



चंदू नाना परदेशी, नगरसेवक राजू फोरेकर, विक्रांत पाटील, शेती संघाचे संचालक रणजीत भीमसेन पाटील, राजसिंह परदेशी, समाजसेवक रामलाल जैन, अर्बन बँकेचे संचालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळी दीपक पाटील, मुकेश परदेशी, महेंद्रसिंग परदेशी, विशाल पाटील, ज्ञानेश्वर राजपूत, प्रा. डी. डी. पाटील, काजी, ॲड. केदार जाधव, सरपंच भरतसिंग पाटील, अजय पाटील, नितीन पाटील, रणजीत पाटील, दिलसिंग पाटील यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिकांनी सहभाग नोंदविला.

जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला युवक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थितांनी महाराणा प्रताप यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून समाजसेवा आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला.

# गुरू अर्जन देव महाराजांच्या पावन शहीदी गुरुपर्वानिमित्त धुळे गुरुद्वारात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम उत्साहात

## भव्य रक्तदान शिबिर, शरबत सेवा आणि २४ तास अखंड 'गुरु दा लंगर'चे आयोजन

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :**
श्री गुरू अर्जन देव जी महाराज यांच्या पावन शहीदी गुरुपर्वानिमित्त धुळे येथील गुरुद्वारा श्री गुरु नानक साहिब जी येथे विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिर, शरबत सेवा आणि २४ तास अखंड 'गुरु दा लंगर'ला भाविक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

याप्रसंगी वरद रक्त केंद्र, धुळे यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शीख समाज बांधवांसह विविध समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. या उपक्रमातून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा आणि रक्तदानासारख्या महत्त्वपूर्ण




सामाजिक कार्याबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला.

शहीदी गुरुपर्वानिमित्त भाविकांसाठी थंडगार शरबत वाटपाची सेवा राबविण्यात आली. तसेच गुरुद्वारामध्ये २४ तास अखंड 'गुरु दा लंगर'चे आयोजन करण्यात आले होते. या लंगरमध्ये शेकडो भाविकांनी सहभागी होत प्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण परिसर भक्ती, सेवा आणि बंधुभावाच्या वातावरणाने भारावून गेला होता. या प्रसंगी अनेक शीख समाजबांधवांनी गुरुद्वारा श्री गुरु नानक साहिब येथे उपस्थित राहून गुरू अर्जन देव जी महाराज यांच्या पावन शहादतीला अभिवादन केले आणि त्यांच्या मानवतावादी विचारांचे स्मरण केले.

याबाबत माहिती देताना धुळे गुरुद्वाराचे प्रमुख बाबा दारा सिंग यांनी सांगितले की, "गुरू अर्जन देव जी महाराज यांनी मानवतेच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ रक्तदान, शरबत सेवा आणि गुरु दा लंगर यांसारखे उपक्रम राबवून समाजसेवेचा संदेश देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

# कृतीशील नेतृत्वाची प्रचिती : नगराध्यक्ष योगेश पाटील यांच्या पुढाकाराने वाकी नदी स्वच्छता मोहिमेला वेग

## पावसाळ्यापूर्वी नदीपात्रातील अडथळे हटवण्याचे युद्धपातळीवर काम; स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित नशिराबादच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** नशिराबाद शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कृतीशील नेतृत्वाची ओळख निर्माण करणारे नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील (पिंटू शेठ) यांच्या विशेष पुढाकाराने अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेल्या वाकी नदीच्या स्वच्छता मोहिमेला सध्या वेग आला आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहराला संभाव्य पूरस्थितीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी नदीपात्रातील गाळ, कचरा आणि अडथळे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह सुरळीत राहावा, शहरात पाणी साचून नागरिकांना त्रास होऊ नये तसेच नदीपात्र स्वच्छ आणि



सुरक्षित राहावे, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. नगराध्यक्ष योगेश पाटील स्वतः प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन कामांचा आढावा घेत असून संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देत आहेत.

नशिराबादच्या विकासासाठी बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर देणारी कार्यशैली हे नगराध्यक्ष योगेश पाटील यांचे वैशिष्ट्य ठरत आहे. प्रसिद्धीपेक्षा विकासकामांना प्राधान्य देत वेळेत आणि गुणवत्तापूर्ण काम पूर्ण व्हावे, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असल्याचे नागरिकांचे मत आहे. वाकी नदी स्वच्छता मोहिमेमुळे परिसराचा चेहरामोहरा बदलू लागला असून नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे. शहरातील पर्यावरण संवर्धनासोबतच पूरनियंत्रणाच्या दृष्टीनेही ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

याबाबत नगराध्यक्ष योगेश (पिंटू शेठ) पाटील म्हणाले, "नशिराबाद स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित करणे हेच आमचे प्रमुख ध्येय आहे. नागरिकांच्या सुखसोयी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनासोबत समन्वय साधून विकासकामांचा वेग कायम ठेवला जाईल."

शहरवासीयांनी ज्या विश्वासाने नेतृत्वाची धुरा त्यांच्या हाती सोपवली, त्या विश्वासाला न्याय देत विविध विकासकामांवर भर दिला जात असून वाकी नदी स्वच्छता मोहीम हे त्याचे आणखी एक महत्त्वाचे उदाहरण ठरत आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## 'जीपीएस' मित्र परिवार व शिवसेना नशिराबादचा स्तुत्य उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी**
ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी आणि अंधत्वाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने नशिराबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. 'जीपीएस' परिवार (गुलाबराव पाटील स्कूल मित्र परिवार) आणि शिवसेना शहर नशिराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जून २०२६ रोजी या भव्य आरोग्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरादरम्यान एकूण २२८



नागरिकांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीनंतर ४१ नागरिकांना मोतीबिंदूचे निदान झाले, तर ६८ नागरिकांना चष्म्याची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले. या सर्व लाभार्थींना पुढील आठवड्यात 'जीपीएस' मित्र परिवार आणि आर. आर. झुंझुनवाला हॉस्पिटल यांच्या माध्यमातून मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांच्या पुढील उपचारासाठी कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून आदरणीय गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १५ जून रोजी विशेष ट्रॅव्हल्स बसद्वारे रुग्णांना मुंबईजवळील पनवेल येथे मोफत नेण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

पनवेल येथील रुग्णालयात दाखल झाल्यानंतर १६ जून रोजी २८ रुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली, तर एका महिला रुग्णाची शस्त्रक्रिया दुसऱ्या दिवशी पार पडली. अशा प्रकारे एकूण २९ रुग्णांवर यशस्वीपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. एका महिला रुग्णाचा रक्तदाब वाढल्यामुळे त्यांची शस्त्रक्रिया पुढील टप्प्यात करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेल्या सर्व रुग्णांसाठी हॉस्पिटल प्रशासनाने राहण्याची, भोजनाची तसेच चहा-पाण्याची उत्कृष्ट व्यवस्था केली होती. १७ जून रोजी सर्व रुग्णांना डिस्चार्ज देऊन त्यांना सुरक्षितपणे नशिराबादकडे रवाना करण्यात आले.

या उपक्रमाच्या माध्यमातून आदरणीय गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रतापभाऊ यांच्या सहकार्याने आतापर्यंत मतदारसंघातील तब्बल १५ हजार नागरिकांच्या मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या सामाजिक उपक्रमामुळे अनेक गरजू नागरिकांना नवजीवन आणि नवी दृष्टी मिळाल्याची भावना व्यक्त होत असून, नशिराबाद ग्रामस्थांनी गुलाबराव पाटील, जीपीएस मित्र परिवार, शिवसेना पदाधिकारी आणि सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत. ग्रामीण भागात अशा आरोग्यसेवा सातत्याने राबविण्याची अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# २०० ग्रंथांचे वाटप करून महेंद्र तायडे यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव |** सध्याच्या काळात वाढदिवस साजरा करण्याच्या बदलत्या पद्धतींमध्ये केक कापणे, फटाक्यांची आतषबाजी आणि भव्य पार्ट्यांचा ट्रेंड वाढत असताना धरणगाव येथील निसर्गप्रेमी तथा समर्पण बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक महेंद्र रुपचंद तायडे यांनी आपल्या ४१ व्या वाढदिवसानिमित्त समाजासाठी प्रेरणादायी ठरेल असा आगळावेगळा उपक्रम राबविला.

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त तसेच मोरया नगरातील दिवंगत मित्र ॲड. विवेक पाटील, देवेंद्र पाटील, देविदास पाटील, दिनेश शिरसाठ आणि चेतन ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ समर्पण बहुउद्देशीय संस्था व चिंतामणी मोरया नगर मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने धरणगाव व परिसरात २०० वृक्षांचे रोपण करण्यात आले. याचबरोबर समाजात वाचन संस्कृतीला चालना मिळावी या उद्देशाने २०० प्रेरणादायी ग्रंथांचे वाटप करून सामाजिक प्रबोधनाचाही संदेश देण्यात आला. या उपक्रमांतर्गत वड, पिंपळ, उंबर, कडुलिंब, बेल, आंबा, अशोक, जांभूळ आणि अर्जुन यांसारख्या पर्यावरणपूरक व दीर्घायुषी वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणासोबतच ग्रंथ भेट देण्याच्या अभिनव संकल्पनेमुळे पर्यावरण संवर्धन आणि वैचारिक समृद्धी यांचा सुंदर संगम घडून आला. कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनअभावी अनेकांना जीव गमवावा लागल्याची वेदनादायी परिस्थिती अनुभवायला मिळाली. त्यातूनच पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक अधोरेखित झाल्याचे सांगत महेंद्र तायडे यांनी भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवागार वारसा निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला.